# श्री बाळासाहेब गुरव (बापू) हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, कवठे महांकाळ

# नियमावली

नियम 1

| | |
|---|---|
| | **शालेय शिस्त...** |
| 1.1 | पालकांकडून शालेय शिस्तीचे पालन होणे अपेक्षित आहे, जेंव्हा शाळा विद्यार्थ्यास चांगल्या सवयीं (स्वच्छता, वेळेचे बंधन, सत्यता, ज्येष्ठांचा आदर इ.) लागाव्या म्हणुन यांच्या बाबतीत आवश्यक सूचना देतात, तेंव्हा शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिलेला निर्णय, आदेश हा अंतिम असेल, त्यावर कुठलीही चर्चा केली जाणार नाही. जेंव्हा मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या बाबतीत काही अनियमितता वाटेल तेंव्हा शाळेचे मुख्याध्यापक म्हणून ते योग्य ती सूचना, आदेश, निर्णय देऊ शकतात. त्या विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक व बंधनकारक असतील. |
| 1.2 | परिपाठातील राष्ट्रगीत संपल्यानंतर उशिराने शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यास त्या दिवसाकरिता शाळेत प्रवेश दिला जाणार नाही. |
| 1.3 | रजा मंजुरीशिवाय विद्यार्थी जर अनुपस्थित राहिला, तर त्यास योग्य त्या कारणासाठी आवश्यक वैद्यकिय प्रमाणपत्र शाळेत उपस्थित होताना सादर करावे लागेल. रजा मंजुरीशिवाय विद्यार्थी मर्यादेपेक्षा जास्त दिवस अनुपस्थित राहिल्यास त्याला पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाणार नाही. |
| 1.4 | शाळेच्या अधिकृत whatsapp ग्रुप मधील सूचना पालकांनी नियमित वाचाव्यात व समजुन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. |
| 1.5 | पालकांनी विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासासाठी शाळेत घेतल्या जाणाऱ्या सर्व शालेय, सहशालेय उपक्रमात विद्यार्थ्याचा सहभाग नोंदवावा व शाळेने दिलेल्या सुचनेनूसार होणाऱ्या प्रत्येक पालक सभेस उपस्थित राहुन आपल्या पाल्याच्या अभ्यासाविषयक प्रगतीचा आढावा घेणे बंधनकारक आहे. |
| 1.6 | शाळेत प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळेतल्या कोणत्याही कर्मचाऱ्यांशी गैर वर्तवणूक करु नये, आपले म्हणणे शाळेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या तक्रार पुस्तिकेत लेखी स्वरुपात नोंदवावे, कोणत्याही पालकाने शालेय परिसरात कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन शाळेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांसोबत केले, तर सदरील विद्यार्थ्याचा प्रवेश शाळेतून तात्काळ रद्द करण्यात येईल. |
| 1.7 | शालेय पोषण आहार विद्यार्थ्यांनी खाणे आवश्यक आहे तसेच मधल्या सुटीतील जेवणाबाबत (शाळा प्रत्यक्ष सुरु असतांना) मधल्या सुटीतील जेवणात पालेभाज्यायुक्त, कडधान्ययुक्त भाजी व पोळी असावी, अन्य "फास्ट फूड, जंकफुड",बिस्कीटे, तळलेले, तयार खाद्यपदार्थ ( बाजारातील ), चॉकलेटस् इत्यादी पदार्थ विद्यार्थ्यासोबत पाठविण्यास पूर्णपणे प्रतिबंध आहे व "प्लास्टिकचा डबा" वापरण्यास पूर्णपणे प्रतिबंध आहे तसेच पाण्यासाठी केवळ बंद (लेस) असलेली वॉटर बॉटलच अनिवार्य आहे. प्रत्येक शनिवारी आवश्यक वाटल्यास विद्यार्थ्याच्या आवडीप्रमाणे घरी तयार केलेले खाद्यपदार्थ देऊ शकता. |
| 1.8 | शाळेत उशिराने आलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश नाकारला जाऊ शकतो याची नोंद सर्व पालकांनी घ्यावी. |
| 1.10 | विद्यार्थी आजारी असल्यास विद्यार्थ्यांस शाळेत पाठवु नये त्यासाठी नियम क्रमांक 1.3 प्रमाणे कृती करावी. |
| | नियम 2 |
| | **पालकांसाठी विशेष सूचना...** |
| 2.1 | वैयक्तिक स्वच्छता करणे, नियमित नखे काढणे, स्वच्छ कपडे/गणवेश घालणे या चांगल्या सवयी पाल्याला लावणे गरजेचे आहे, त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा. |
| 2.2 | पाल्याला स्वत:ची कामे स्वत: करण्यासाठी लहानपणापासून सवय लावा. |
| 2.3 | पाल्याला शाळेत नियमितपणे आणि वेळेवर पाठवा. नियोजित वेळेपेक्षा पाच मिनीटांपेक्षा जास्त उशिर होणार नाही याची दक्षता घ्या. |
| 2.4 | पाल्याला रोज एक तास त्याच्या वयाला अनुरुप खेळ खेळण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी. |

| | |
|---|---|
| 2.5 | शाळेतील सहशालेय उपक्रम, अभ्यास या विषयी दररोज माहिती घ्यावी व आवश्यकता वाटल्यास वर्गशिक्षकांना प्रत्यक्ष शाळा सुटल्यानंतर भेटून माहिती घ्यावी. |
| 2.6 | घरचा अभ्यास रोज दिला जातो. त्यासाठी पाल्याला रोज किमान दोन-तीन तास अभ्यासाला बसवा. |
| 2.7 | टी.व्ही., मोबाईल इंटरनेट व सोशल मिडिया वापरावर नियंत्रण ठेवा, परंतु शैक्षणिक तसेच ज्ञान वाढविणारे कार्यक्रम ऐकण्यासाठी, पाहण्यासाठी उत्तेजन द्या. विद्यार्थ्यांना किमान आठवड्यातून 3 दिवस ऐकून लिहिणे (श्रृतलेखन) सराव घ्यावा. |
| 2.8 | जेवतांना सर्व पदार्थ खाण्याची विद्यार्थ्यास सवय लावा. डब्यात फक्त पोळी भाजीच देणे आवश्यक आहे. |
| 2.9 | एखादा छंद जोपासण्यासाठी आपल्या पाल्याला वेळ देवून मदत करा. |
| 2.10 | घरात आणि घराबाहेर इतरांना मदत करण्यासाठी विद्यार्थ्याला प्रेरित करा. |
| 2.11 | आपल्यापेक्षा वयाने मोठे असलेल्या व्यक्तिंसोबत आदराने वागण्याची पाल्यास सवय लावा. |
| 2.12 | शाळा सुटल्यानंतर शाळेत येऊन शिक्षकांची भेट घ्या. आपल्या पाल्याच्या प्रगतीविषयी त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करा व चर्चेनंतर सूचविलेली योग्य ती उपाययोजना अंमलात आणा. |
| 2.13 | सर्व परीक्षांचे एकूण संपादित गुण मिळुन निकाल तयार होतो, तरी प्रत्येक परीक्षेत उपस्थिती आवश्यक आहे. |
| 2.14 | शाळेत दररोज दिलेला अभ्यास, स्वाध्याय पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी पालकांची आहे. |
| 2.15 | आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी शिक्षकांना नियोजित वेळेतच भेटणे आवश्यक असेल. |
| 2.16 | शालेय प्रशासनाकडून येणाऱ्या सूचना, प्रगती पुस्तके, वह्या याकडे वेळोवेळी योग्य लक्ष देवून येणाऱ्या अडचणी सोडवाव्यात. |
| 2.17 | शाळा व आपले घर यात सुसंवाद निर्माण होईल असा जाणीवपूर्वक प्रयत्न असावा. |
| 2.18 | शाळेच्या अधिकृत whatsapp ग्रुपच्या माध्यमातून आपल्या पाल्याचा शैक्षणिक विकासाचा अहवाल आपणास मिळणार आहे या जाणीवेने प्रत्येक उपक्रमाकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. |
| 2.19 | रजेबाबत लेखी अर्ज मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. तीन दिवसापर्यंतचा वर्ग शिक्षकांकडे व त्यापेक्षा जास्त दिवसापर्यंतची रजा हवी असेल तर मुख्याध्यापकांकडून मंजुर करून घ्यावी. रजेचा अर्जाचा नमुना शाळेच्या अधिकृत संकेतस्थळावर दिलेला आहे, त्यावरून स्वतंत्र कागदावर अर्ज लिहावा व तो प्रत्यक्ष शाळेत भेटून ती मंजुर करुन घ्यावी. तसेच आजारी वा अस्वस्थ विद्यार्थ्याचा सुटीचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची विहित कार्यपद्धती नियम क्र 1.3 मध्ये दिलेली आहे. |
| 2.20 | विद्यार्थ्याला शाळेत आणुन सोडणे व शाळा सुटल्यानंतर परत घेऊन जाणे यांची संपूर्ण जबाबदारी पालकांची असेल, दरम्यानच्या काळात विद्यार्थ्याबाबत काही समस्या निर्माण झाल्यास शाळा प्रशासन त्यास जबाबदार राहणार नाही. |
| 2.21 | कुठलीही तक्रार तोंडी न करता ती लेखी स्वरुपात तक्रार पुस्तिकेत शाळेत प्रत्यक्ष येऊन करणे बंधनकारक आहे. |
| 2.22 | शाळेकडुन विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेच्या बाबतीत सूचना आल्यास त्वरीत त्या बाबीचे निराकरण करावे. |
| 2.23 | विद्यार्थ्याने स्वच्छताविषयक सर्वच चांगल्या सवयीचे पालन करणे बंधनकारक असेल. |
| 2.24 | शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शाळेने ठरवुन दिलेल्या युनिफोर्म मध्येच येणे बंधनकारक असेल. |
| **महत्वाचे** – | विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक नियम तसेच बाबी या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे. |

| नियम 14 | |
|---|---|
| **शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.) मिळण्यासंबंधी कार्यपद्धती** | |
| 3.1 | विद्यार्थी शाळेत प्रवेशित असेल व त्यास कोणत्याही कारणास्तव शाळा सोडावयाची असेल तर पालकांनी शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी पालकाच्या स्वाक्षरीनिशी विद्यार्थी ज्या वर्गात शिकत असेल त्या वर्गशिक्षकांना भेटून त्यांच्याकडे अर्ज सादर करावा, अर्ज सादर करतांना विद्यार्थ्याकडे शाळेने दिलेले कोणत्याही प्रकारचे पुस्तके जमा करावीत व कोणत्याही प्रकारचे शुल्क बाकी नसावे. |
| 3.2 | पालकांनी वर्गशिक्षकांकडे सादर केलेला अर्ज वर्गशिक्षक शाळा सुटल्यानंतर शाळेच्या कार्यालयात स्टुडंट आय.डी.सह जमा करतील व कार्यालयाकडून तीन दिवसांच्या आत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र टि.सी तयार करुन घेऊ पालकांकडे ठरलेल्या वेळेत हस्तांतरीत करतील. |
| 3.3 | मूळ दाखला हरवल्यास दुबार दाखला मिळविनेसाठी Affidevait करणे आवश्यक आहे तसेच दाखला मागणी अर्ज करणे आवश्यक आहे. |